# मेट्रो ३ : ट्रॅक टाकण्याचे काम १८ टक्के पूर्ण

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गाच्या ट्रॅकचे काम १८ टक्के पूर्ण झाले असून संपूर्ण मार्गिकेदरम्यान ६६.०७ किमीचा ट्रॅक बसवण्यात येणार आहे.

जपानमधून मेसर्स मित्सुई कंपनीच्या माध्यमातून तीन स्लॉटमध्ये रेल्वे आयात करण्यात आल्या आहेत. तर ट्रॅकच्या स्थापनेचे काम आणि ट्रॅकचे बांधकाम मेसर्स लार्सन अँड टुब्रोला देण्यात आले आहे. मुंबई मेट्रो रेलच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मेट्रो ३ मार्गिकेचे कामही वेगाने सुरू असून ६६.०७ किमीचा ट्रॅक बसवण्यात येणार आहे. जपानी कंपनीच्या माध्यमातून १० हजार ७४० टनांची हेड हार्डनेट रेल मेट्रो ३ च्या



## मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनची माहिती

कामासाठी वापरण्यात येणार आहे.

मेट्रो ३ मार्गिका जीर्ण व धोकादायक इमारतींच्या परिसरातून तसेच ऐतिहासिक वारसा असणाऱ्या इमारतींच्या परिसरातून वाट काढत आहेत. त्यामुळे अद्ययावत तंत्रज्ञानाचा आधार घेत भारतात प्रथमच लो व्हायब्रेशन ट्रॅक तंत्रज्ञान अवलंबण्यात आले आहे. मेसे सोनिविले एजी या स्विस कंपनीच्या माध्यमातून तयार केलेल्या या अहवालानुसार गाड्या चालवताना निर्माण होणारा उच्च पातळीचा आवाज व कंपन कमी करण्यात यश येणार आहे. नव्या तंत्रज्ञानामुळे मेट्रो ३ च्या भुयारातून मार्गक्रमण करताना प्रवाशांसाठी आरामदायी सुविधेचा लाभ घेता येणार आहे. तर ट्रॅकसाठी वापरण्यात येणारे स्लीपर्स वडाळा कारशेडमध्ये तयार करण्यात येणार आहे.

■ एमएमआरसीएलने संपूर्ण प्रकल्पासाठी एकूण २ लाख १ हजार ६०० स्लीपर ब्लॉक्सची आवश्यकता असणार आहे. मेट्रो लाइन ३ मध्ये आतापर्यंत एकूण प्रगती ७१ टक्के आहे. एकूण ९७ टक्के बोगद्याचे काम पूर्ण झाले आहे.

■ स्थानक उभारणीचे काम वेगाने सुरू असून एकूण ७७ टक्के काम झाले आहे. तर आतापर्यंत ३४ टक्के प्रणालीची कामे पूर्ण झाली आहेत; अशी माहिती एमएमआरडीएलने दिली.